MHST200002772025

## नि.दि.दा.क्र.१२५/२०२५ मधील निशाणी क्र.११५ वरील आदेश

प्रतिवादी क्रं.४ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला विना म्हणणे विना कैफियत आदेश रद्द होवुन म्हणणे व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुद्ध होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुद्ध त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. प्रतिवादी क्रं.४ यांचेवर दि.११.०६.२०२५ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दि.२३.०१.२०२६ रोजी दिला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं.४ यांना कैफियत देण्यास ४ महिन्यांहुन अधिक दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. परंतु, प्रतिवादी हे सरकारपक्ष असल्याने खर्चाबाबत आदेश करणेत येत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस

पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रं.४ यांचेविरुद्ध झालेला विना म्हणणे विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवून त्यांचे म्हणणे व कैफियत स्वीकारणेत येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.03.20 10:59:03 +0530

स्थळ : वाई. (ए. ए. पाचरणे)
दिनांक : १७.०३.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.